दिनांक : ०२/०३/२०२०

# इतिवृत्त

यशदा आवारातील उद्यान विकसन व देखभाल दुरुस्ती या कामासाठी सन २०२०-२२ या कालावधीसाठी दिनांक २५/०२/२०२० ते ११/०३/२०२० या कालावधीमध्ये ई निविदा-मागविण्यात आल्या आहेत .

२. सदरच्या ई निविदेबाबतची-निविदापुर्व बैठक (Pre-bid meeting) दिनांक ०२/०३/२०२० रोजी दुपारी २.३० वाजता आयोजित करण्यात आली होती.या बैठकीला खाली नमूद करण्यात आल्यानुसार यशदाचे प्रतिनिधी तसेच निविदादार /प्रतिनिधी उपस्थित होते.

| अ. क्र. | बैठकीसाठी उपस्थित असलेले यशदाचे प्रतिनिधी |
|---|---|
| ०१ | श्री. सतीश तडकसे, वित्तीय सल्लागार, |
| ०२ | श्री. सदाशिव पाटील, निबंधक, |
| ०३ | श्री. दे. श. शेळके, लेखाधिकारी तथा प्रमुख प्रापण, |
| ०४ | श्री. विकास कटकधोंड, सहायक निबंधक, |
| ०५ | श्री. रविंद्र आवाड, कनिष्ठ अभियंता, स्थापत्य |
| | **निविदादार /प्रतिनिधी** |
| ०१ | मे. जे. के एन्टरप्रायजेस, पुणे |
| ०२ | मे. निरंकार ग्रीन्स् मल्टीसर्व्हिसेस, पुणे |
| ०३ | मे. निसर्ग लॅन्डस्केप प्रा. लि. पुणे |
| ०४ | मे. संकल्प मॅनपॉवर व फॅसीलिटी सर्व्हिसेस प्रा. लि. पुणे |

०३ सदर बैठकीमध्ये चार निविदादार /प्रतिनिधी उपस्थित होते. निविदादारांकडुन काही मुद्दे उपस्थित करण्यात आले होते.

अ) या चार निविदादारापैकी मे. निसर्ग लॅन्डस्केप प्रा. लि. पुणे यांच्या व्यतिरिक्त तीन निविदाराकाकडे PWD Registration Certificate नसल्याचे त्यांनी नमूद करुन ही अट शिथिल करण्याबाबत विनंती केलेली आहे. तसेच तीन निविदाधारकांनी P.W.D. हे उद्यान कामाबाबत स्वतंत्र असे Registration देत नाही असे नमुद केले.

ब) तसेच मे. जे. के एन्टरप्रायजेस, पुणे, यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेले C.P.W.D. Horticulture Licence ग्राह्य धरण्याबाबत विनंती केली आहे.

क) मे. निसर्ग लॅन्डस्केप प्रा. लि. पुणे. यांनी कळविले की निविदेतील अटी व शर्ती प्रमाणे सदरची निविदा भरताना लेबर लायसन्स सादर करण्यात सांगितले आहे. तथापि, महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक ०५/०१/२०१७ (RNI NO :- MAHENG/2009/35528) प्रमाणे लेबर लायसन्ससाठी साईट वर ५० व त्या पेक्षा जास्त लेबर असणे आवश्यक आहे, तरच लायसन्स मिळते. तसेच आपल्या कार्यस्थळावर ५० पेक्षा कमी लेबर लागत असल्याने त्याठिकाणी लेबर लायसन्स ची आवश्यकता नाही. तरी सदर च्या निविदेमधील टाकलेली अट एक तर शिथिल करण्यात यावी किंवा त्याठिकाणी महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक ०५/०१/२०१७ (RNI NO :- MAHENG/2009/35528) ग्राह्य धरण्यात यावा असे या कंत्राटदारांनी लेखी पत्राद्वारे कळविले आहे.

ड)	मे. संकल्प मॅनपॉवर व फॅसीलिटी सर्व्हिसेस प्रा. लि. पुणे यांनी त्यांचा खाजगी क्षेत्रातील विविध नांमाकित कंपन्यामधील उद्यान देखभाल दुरुस्ती कामाचा अनुभव असल्याने निविदेतील अटी व शर्तीनुसार शासकिय व निमशाकिय व्यतीरिक्त खाजगी क्षेत्रातील कामाचा अनुभव ग्राह्य धरण्यातबाबत विनंती केली.

०४	निविदादारांकडुन उपस्थित केलेल्या मुद्दयांवर व सादर केलेल्या निवेदनांवर दि.०२/०३/२०२० रोजीचे खरेदी समितीच्या बैठकीमध्ये खालीलप्रमाणे सर्वानुमते निर्णय घेण्यात आले.

| अ. क्र. | निविदादारांनी उपस्थित केलेले मुद्दे | खरेदी समिती कडुन घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| १. | PWD Registration Certificate बंधनकारक/आवश्यक आहे का ? | निविदेतील पृष्ठ क्र. ५ वरील अट क्र. ३.१(a) कायम राहिल. |
| २. | C.P.W.D. Horticulture Licence ग्राह्य धरण्यात येईल का ? | वैध PWD Registration Certificate ऐवजी वैध C.P.W.D. Horticulture Licence ग्राह्य धरण्यात येईल. |
| ३. | यशदा उद्यान कामाच्या साईटवर ५० पेक्षा कमी लेबर असल्याने लेबर लायसन्सची आवश्यकता नसल्याने महाराष्ट्र शासन निर्णयानुसार सदर अट शिथिल करण्यात यावी. | निविदेतील पृष्ठ क्र. ६ वरील अट क्र. ३.१(i) प्रमाणे राहिल. तथापि ज्यांच्याकडे सदर लेबर लायसन्स उपलब्ध नाही त्यांनी त्याच्याकडे लेबर उपलब्ध असलेबाबत प्रमाणिकरण करावे व शासन राजपत्र दिनांक ०५/०१/२०१७ (RNI NO :- MAHENG/2009/35528) तांत्रिक लिफाफ्यात अपलोड करावा. |
| ४. | निविदेतील अट क्र ३.१ (e) अटी व शर्तीनुसार शासकिय व निमशाकिय व्यतीरिक्त खाजगी क्षेत्रातील कामाचा अनुभव ग्राह्य धरण्यात यावा. | निविदेतील पृष्ठ क्र. ५ वरील अट क्र. ३.१(e) कायम राहिल. |

०५	प्राप्त निवेदनातील उपस्थित मुद्दे, तसेच निविदादारांनी निविदापुर्व बैठकीमध्ये उपस्थित केलेल्या शंकाचे निरसन वरील प्रमाणे करण्यात येत आहे.

०६	तसेच सदरचे इतिवृत्त यशदा आवारातील उद्यान विकसन व देखभाल दुरुस्ती सन २०२०-२२ या कामासाठीच्या ई-निविदा अटी-शर्तीचा भाग राहील.

(कनिष्ठ अभियंता, स्थापत्य)	(सहाय्यक निबधंक)

(प्रापण प्रमुख,)	(निबधंक)	(वित्तीय सल्लागार)